महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक ४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१ Email ID: vishi३-htcd@mah.gov.in

क्रमांक: रुसायो-२०२३/प्र.क्र.१०३/विशि-३ दिनांक: ०५ जुलै, २०२३.

**विषय:** इस्माईल युसुफ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मुंबई या महाविद्यालयास भौतिक सुविधा या घटकांतर्गत बांधकाम व साहित्य खरेदी या कामांसाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**संदर्भ:** १. शासन ज्ञापन क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२४५/विशि-३, दि.१०.०८.२०२१.
२. राज्य प्रकल्प सहसंचालक, राज्य प्रकल्प संचालनालय, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांचे पत्र क्र. राप्रसं/रुसा/आदेश/२०२२-२३/२३३, दि.१८.०४.२०२३.
३. इस्माईल युसुफ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मुंबई यांचे पत्र क्र.इयुम/रुसा/२०२२-२३/ ६१३, दि.२८.०३.२०२३.
४.इस्माईल युसुफ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मुंबई यांचे पत्र क्र.इयुम/रुसा/२०२२-२३/ ६६७, दि.११.०४.२०२३.

**प्रस्तावना:**

इस्माईल युसुफ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मुंबई या महाविद्यालयास भौतिक सुविधा या घटकांतर्गत रु. २.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. उपरोक्त संदर्भ क्रमांक १ च्या ज्ञापनान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने सदर महाविद्यालयाने उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये रु.७१.६३ लक्ष/- एवढ्या रकमेचे रीडिंग रूम बांधकाम व एच.पी.टी.एल.सी. लॅबोरेटरी च्या नूतनीकरण तसेच संदर्भ क्रमांक ४ च्या पत्रान्वये लेक्चर हॉल नुतनीकरणाच्या कामांसाठी एकूण रु.२३.३९ लक्ष/- एवढ्या रकमेच्या तसेच फर्निचर/साहित्य खरेदीच्या एकूण रु.५.४१लक्ष/- एवढ्या रकमेचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता रुसा संचालनालयास सादर केले आहेत. त्याअनुषंगाने येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची राज्य सहसंचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये विनंती केली होती.

**ज्ञापन:**

राज्य प्रकल्प संचालनालय (रुसा), मुंबई यांनी शिफारस केलेल्या इस्माईल युसुफ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मुंबई या महाविद्यालयाकरिता भौतिक सुविधा या घटकाअंतर्गत नवीन रीडिंग रूम बांधकाम व एच.पी.टी.एल.सी. लॅबोरेटरी च्या नूतनीकरणांतर्गत बांधकामाच्या कामांसाठी कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई आणि मुख्य अभियंता, मुंबई विभाग यांनी प्रमाणित

Scanned with OKEN Scanner

केलेल्या अंदाजपत्रकांनुसार रु.७१.६३ लक्ष (रुपये एकाहत्तर लक्ष त्रेसष्ट हजार फक्त) एवढ्या रकमेच्या (सोबत Recapitulation Sheets जोडलेल्या आहेत.) तसेच लेक्चर हॉल नुतनीकरणाच्या कामांसाठी रु.२३.३९ लक्ष (रुपये तेवीस लक्ष एकोणचाळीस हजार फक्त) एवढ्या रकमेच्या आणि खालील नमूद केलेल्या फर्निचर/साहित्य खरेदीच्या रु.५,४०,९५५/- (रुपये पाच लक्ष चाळीस हजार नऊशे पंचावन्न) अशा **एकूण रु.१,००,४२,९५५/- (रुपये एक कोटी बेचाळीस हजार नऊशे पंचावन्न फक्त)** एवढ्या रकमेच्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | फर्निचर/ साहित्य | संख्या | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|
| १ | Student Lockers | १० | २,१५,०००/- |
| २ | Books/Journals | - | ३,२५,९५५/- |
| | एकूण | | ५,४०,९५५/- |

२. सदर मान्यता शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दि.१७ एप्रिल, २०१५ मधील वित्तिय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग पाच मधील अ.क्र.१०, नियम क्र.१३४ तसेच उपविभाग दोन मधील अ.क्र.३४, नियम क्र.७ व अ.क्र.३६, नियम क्र.७ यानुसार प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

३. उपरोक्त बाबींवर होणारा खर्च "मागणी क्रमांक-डब्ल्यू-२, प्रधानशीर्ष- २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३- विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०३- शासकीय महाविद्यालये व संस्था, (०७) (०१) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहायक अनुदान (६० टक्के केंद्र हिस्सा) (२२०२आय२६३) व (०७) (०२) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहायक अनुदान (४० टक्के राज्य हिस्सा) (२२०२आय२७२), ३१ सहायक अनुदाने " या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. यावरील खर्च प्रशासकीय मान्यता दिलेल्या रकमेच्या मर्यादेत राहील याची दक्षता घ्यावी. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अ.म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
३) महालेखापाल, (लेखा परीक्षण), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर.
४) प्राचार्य, इस्माईल युसुफ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अभिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) निवड नस्ती (विशि-३).

Scanned with OKEN Scanner